# कुटुंबायन

सुषमा दातार

**कुटुंबायन  (ललित लेख संग्रह)**

kutumbayan- lalit lekh sangrah

© सुषमा दातार

**प्रकाशक**

साहित्यसंस्कृती,

४६२६ किंग्ज लँडिंग लेन

केटी, टेक्सास, अमेरिका- ७७४९४

**ISBN**: 978-1-939830-13-5

**मुखपृष्ठ-**

मनीष देशपांडे

**संपादन-**

सोनाली जोशी

**मुद्रितशोधन-**

उत्पल व. बा

All rights reserved.  No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any physical or electronic form or by any other means, without the prior written permission from the Publisher and the Author.

# पेरेंटिंग ॲनोनिमस

काल सकाळपासून तिच्या मनात एकच गाणं घोळत होतं. चाल होती 'व्हाय धिस कोलावेरी कोलावेरी डी' ची. पण शब्द मात्र तिचे स्वतःचे. 'का अशी गोची होते, गोची होते, माझी नेहमी SSS' चुकीच्या बसमधे बसल्यावर तिकीट काढताना भर गर्दीत कंडक्टर आपलं 'शिक्षण ' काढतो तेव्हा जसं वाटतं तस्संच वाटलं होतं काल तिला. शिवाय लग्न आणि मुलांच्या बाबतीत हिच्या पुढे गेलेल्या मित्र मैत्रिणींनी दिलेली बर्ड्स ॲंड बीजची वॉर्निंग हिनं ऑप्शनला टाकली होती, तीही आठवली. भाजी चिरता चिरता तिला ललिता मावशीची आठवण झाली. आपलं पोर आपल्याला ट्रिकी प्रश्न विचारतं तेव्हा आपल्याला ग्रे हेअर आणि ग्रे मॅटरचं कॉम्बिनेशन असलेल्यांचीच का आठवण होते? लग्नाच्या आधी आपण किती इम्पेशंट असायचो या कॉंबिनेशनच्या बाबतीत. जाम बोअर व्हायचं.पण ललिता मावशी इज डिफरंट. भाजी फोडणीला टाकून तिनं फोन हातात घेतला तेव्हा वेडी-वाकडी कुरतडलेली स्वतःची नखं दिसली तिला. मग तर तिला सायमलटेनिअसली दोन गोष्टींची खंत वाटली.

एक-आपण हल्ली पार्लरला जायचीही टाळाटाळ करतो त्याची आणि दोन-आपण स्ट्रेस्ड झालो की नखं खातो त्याची. हात ललिता मावशीचा नंबर फिरवत होता आणि डोकं स्वतःला खात होतं. आपल्या सारख्या व्हर्सटाईल, इंटेलिजंट मुलीला ( अंतर्मन कुजबुजलं, 'मुलीला काय बाईला म्हण आता' आणि पार्लरची आठवण अधिकच तीव्र झाली.) या चिमुरड्यानं अशी लाज आणावी.....टेलीफोन न धरलेला हात सहजच तोंडाकडे गेला. तो शाळेतून यायच्या आधी आणि आजी आजोबा बाहेरून यायच्या आधी मावशीशी बोलायला

हवं. ओssss मावशी पिक अप द फोन.....प्लीज. नखं खाण्याच्या नादात पलीकडच्या डायलटोनकडे जेव्हा लक्ष गेलं तेव्हा तो 'समझनेवाले समझ गये है, ना समझे वो अनाडी है' पर्यंत पोचला होता. या मावशीला पण हाच डायल टोन लावायचा होता, इथे पण अक्कल निघतेय !!!! ती तिच्या आईच्या भाषेत 'करवादली', "बोला यमूताई, काय चाललं आहे? " ललिता मावशीनं तिच्यासाठीच्या स्पेशल टोनमधे पलीकडून विचारलं आणि तिचा तोंडाजवळचा हात झर्रकन खाली आला. "ए मावशी तुला कसं कळलं मी नखं खाते आहे ते " मावशी छद्मी का काय म्हणतात तसं हसली आणि म्हणाली " म्हणजे तू नखं खाते आहेस. स्ट्रेस्ड. हं बोल. चिरंजिवांनी काय प्रताप केले?" मॉडर्न यामिनीचं यमू करण्याचा हक्क् या एकमेव मावशीला आपण का दिलाय ते लख्ख दिसलं तिला.

मनकवडी मावशी. "अगं त्याच्या सततच्या चळवळीचं आणि भन्नाट खेळांचं काही नाही गं वाटत. इट इज माय सरोगेट जिम. छान मजा येते आणि व्यायामही होतो. पण त्याच्या सुपीक मेंदूतून निघणाऱ्या प्रश्नांचं काय करायचं कळत नाही. तू मागच्या वेळेस जी युक्ती सांगितली होतीस 'बी ट्रुथफुल,बट बी ब्रीफ' ती बॅकफायर झाली काल. कामवाल्या कमलाबाईंची मुलं,आजी आजोबा असे आम्ही सगळे टीव्ही बघत होतो. बाबा माणूस नेहमीप्रमाणे गैरहजर होता. हा कोलांट्या मारत होता. आणि.... ती शाई ओतायची जाहिरात आली. ती आली की अजूनही खड्डा पडतो पोटात माझ्या. पण वाटलं, तू म्हणालीस त्या प्रमाणे हेल्थ गाईडच्या आधारे सगळं समजावलं आहे तर आता कशाला घाबरायचं, शिवाय त्याचं लक्षही नाहीये !! पण नाही. कोलांट्या थांबवून हा म्हणाला "आमची आई हा ब्रॅंड नाही वापरत +*#^+ हा वापरते". तोंड कुठे लपवावं याचा विचार करतेय तर पुढचे तारे तोडलेन. "हॅं!!

काहीही दाखवतात. असं निळं वगैरे नसतं ब्लड. सगळयांचं सारखंच रेड असतं." एवढंही पुरे नाही की काय म्हणून पुढे म्हणाला "हो की नाही गं आई ?" कॅन यू इमॅजिन, सगळे माझ्याकडेच बघायला लागले." साध्या आठवणीनंही ही लाजून लाजून चूर होत असताना मावशी मात्र खळाळून हसली. "अगं हो हो. इथंही वापर ना 'बी ट्रुथफुल, बट बी ब्रीफ'. त्यानं 'हो की नाही गं आई?' एवढंच विचारलं ना, मग म्हणायचं 'हो बरोबर आहे.' म्हणून.काय प्रॉब्लेम काय आहे तुझा?" "मावशी तू ना अगदी फुल्या फुल्या फुल्या आहेस. " ती आत्मसंयमानं म्हणाली. "अगं म्हण निर्लज्ज आहेस म्हणून".आता ही मिश्किल-मावशी कुठली आठवण सांगणार ते तिला लख्ख दिसलं. तिच्या लहानपणची गोष्ट. असेच सगळे व्हीसीआर वर सिनेमा बघत होते. हीरो हिरॉईनचं पावसातलं गाणं संपलं.

ही म्हणाली "पावसात भिजलेतना हे दोघं....आता कॅंप फायर करून कपडे वाळवतील आणि मग तिला बाळ होईल." या उद्गारावर हिच्या मातोश्रींचा भडका उडाला होता आणि ललिता मावशीनं हसत हसत हिला पाठीशी घातलं होतं. तेव्हा हिची आई मावशीला म्हणाली होती " लले, लाज लज्जा काही आहे का नाही तुला. एक धपाटा घाल तिच्या पाठीत. पाठीशी काय घालतेस. कुणासमोर काय बोलायचं,काही पोच हवा की नको मुलीच्या जातीला ?" आता या माझ्या मुलाच्या जातीला कुठला नियम लावायचा हा नवाच प्रश्न पडला तिला. म्हणजे मुलग्यानं तो प्रश्न विचारला म्हणून आपल्याला त्रास होतोय का? लगेच मनकवडी मावशी बोललीच, "अगं तो चारचौघात बोलला याचा त्रास वाटतो आहे ? का तो मुलगा आहे आणि तरी बायकी विषयावर बोलतोय हा त्रास आहे तुझा? का त्याला प्रश्न पडतात याचाच त्रास होतोय तुला? आठवतं तुला...'तू मोठी होणार आता....' अशी सुरवात करून मी तुला सगळी

वयात येण्याची माहिती सांगितली होती तेव्हा नाक वर करून जोरात म्हणाली होतीस ' मला माहीत आहे सगळं. एवढं सीक्रेट सांगितल्यासारखं हळू हळू काय बोलते आहेस ?' मग आता कसलं टेन्शन आलंय? तुला मी बोलावलं होतं आमच्या पेरेंट-स्कूल मधे ये म्हणून.पण तू आणि सुमित म्हणजे 'know all' आहात ना. आला नाहीत. आता ये. या महिन्याचा विषय आहे 'When I was embarrassed.' मी मेल पाठवलीच आहे तुला." मावशीशी बोलून बरं वाटण्याचा काही चान्स नव्हताच.नाकाला करपलेल्या भाजीचा वास झोंबला आणि त्या गोचीच्या गाण्याचं नवं आवर्तन सुरू झालं.

तिनं गॅस बंद केला.दुसऱ्या दिवशीची पार्लरची अपॉइंटमेंट घेतली.मोठा श्वास घेऊन ती 'भाजी-रेस्क्यू-मिशन'कडे वळली.सगळ्या वैचारिक गोंधळाचा शेवट 'नोकरीतून ब्रेक घ्यायचा निर्णय चुकला की काय!' या पालुपदानं करायचा नाही हे ठरवलेलं असूनही ते आलंच मनात. पुढचा दिवस तसा अनइव्हेंटफुल गेला.निळ्या शाईची किंवा तत्सम सावलीही पडली नाही त्यावर. ललिता मावशीची मेल पाहून तिनं कॅलेंडरवर तारीख, वेळ मार्क केली. गैरहजर बाबाचा फोन आला तेव्हाही सगळ्यांच्या बोलण्याच्या टर्न्स झाल्यावर तिनं तो प्रसंग वगळून दिवसाचा जमाखर्च त्याच्यापुढे मांडला आणि आम्ही मजेत आहोत अशी पुस्ती जोडली. चिडवणाऱ्याच्या हाती कोलीत कशाला म्हणून पेरेंट-स्कूलचा उल्लेखही केला नाही. तो फेसबुकी नसल्यानं धोका नव्हता म्हणून तिनं पेरेंट स्कूलला जाणार असल्याची पोस्ट टाकली. त्याला सतरा लाईक,चार 'वॉव', तीन 'गुड फॉर यू', पाच 'हेल्पफुल', दोन 'इट वर्क्स', एक 'ही भंकस असते सगळी' अशा कॉमेंटही आल्या मिनीट भरात. त्यावर रिॲक्ट होऊन वाद वाढवायच्या मूडमध्ये ती नव्हती. त्यामुळे काही जणांच्या भिंती धुंडाळून तिने लॉग आऊट केलं. पालक-

शाळेचा दिवस उजाडला तेव्हा तिच्या मनात, आशाबाईंच्या मस्तमौला आवाजातलं 'रंग दे मुझे रंग दे' चं आवर्तन चालू होतं. 'अ गुड डे फॉर मी'. तिनं स्वतःला शाबासकी दिली. लेकाला शाळेला वेळेत पाठवायची सकाळची कसरत तिनं लीलया आटपली. मग आजी-आजोबांबरोबर ब्रेकफास्ट झाला. सोबतीला आज राजकारणा ऐवजी नाटकाची चर्चा होती. अगेन अ गुड डे. दिवसाचं नियोजन करून ती पालकशाळेत हजर झाली.

सगळे गोलात खुर्च्यांवर बसले होते. एक मस्त ग्रे डॉक्टर जोडपं ललिता मावशी बरोबर कार्यक्रम कंडक्ट करताना तिला दिसलं. ती हळूच रिकाम्या खुर्चित बसली. समोरचा एक टॉल,डार्क,हॅंडसम,बाबा बावळट चेहरा करून आपली एंम्बरॅसमेंट सांगत होता. "वॉव फॉर अ चेंज बाबाची फजिती ऐकायला मिळणार" ती मनातल्या मनात खुश झाली. "पार्थच्या शाळेतून भेटायला बोलावणं आलं. माझी जायची पहिलीच वेळ असली तरी मी कूल होतो. अभ्यासाचं असणार काहीतरी. टीचरच्या ऑफिसमधे गेलो तर काकू छाप प्रिन्सिपल आणि लहानशी केजी टीचर दोघी गंभीर चेहरा करून बसल्या होत्या. मी समोरच्या खुर्चीत बसायच्या आत टीचर म्हणाल्या "तुम्ही आलात होय. पार्थची आई नाही आली?" मी शूरपणे म्हणालो, "काय असेल ते मलाच सांगा. ती टूरवर आहे. आय विल टेक केअर ऑफ एव्हरीथिंग" त्या चाचरत म्हणल्या " नाही म्हणजे त्या आल्या असत्या तर बरं झालं असतं. काय आहे...." दोघींनी एकमेकींकडे पाहिलं. न आलेला घाम पुसला. मला मात्र तोवर घाम फुटू लागला. मग त्या काकू टाईप प्रिन्सिपलनी थेट मुद्द्याला तोंड फोडलं. लिटरली. "काल पार्थनं वर्गातल्या सायलीच्या ओठावर किस केलं."

मी तातडीनं ओठ चावला. चुकीची रि अॅक्शन, पण झालीच. त्या पुढचा मागचा भूगोल सांगत होत्या आणि मी....माझं वर्णन करायला शब्दच नाहीत....." सगळी पालकशाळा तोवर एकसाथ हसत होती. आता मलाही हसू येतंय. पण तेव्हा मीच कुणाचातरी विनयभंग

केल्यासारखं वाटलं होतं. एक्सक्यूजेसचा दंगा चालला होता माझ्या डोक्यात. आम्ही नाही हो त्याच्यासमोर असं काही....नो नो. खरं असलं तरी असं कसं सांगणार? तेही लेडी टीचर समोर. टीव्हीत बघितलं असणार हे सेफ राहील. पण मग त्या म्हणणार, तो काय बघतो त्याच्याकडे जरा लक्ष ठेवा. म्हणजे घुमा फिराके आमच्याच भोज्ज्याशी येणार. आम्हाला जे करायला लग्न होईपर्यंत वाट बघावी लागली ते हा करून मोकळा, असा जरा चावट विचारही आला. पण आता काय बोलायचं आणि पुढे काय करायचं ते काही सुचेना. आय वॉज सायलेंट लाईक अ लॅंब. मी आपलं त्यांनाच विचारलं "मग आम्ही आता काय करायचं? शुड वी से सॉरी टु सायलीज पॅरेंट्स?" असं काहीच्या काही चाललं होतं डोक्यात.त्यांनीच मग मला या ललितातार्ईकडे पाठवलं. तर त्यांनी सगळी हवाच काढली पटकन. म्हणाल्या "फार गंभीरपणे घेऊ नका हो हा प्रसंग.पण इग्नोअरही नका करू. फक्त सांगा त्याला. इट्स नॉट अ बॅड थिंग बट इट्स नॉट अ डन थिंग आयदर. या प्रसंगाचं भयंकरीकरण नका करू. आणि तुम्ही गिल्टी वाटून घेऊ नका. टीचरशीही मी बोललेय. सायलीच्या पालकांशीही बोला हवं तर. मी बोललेय त्यांच्याशी." मी शांत झालो.  ही मुत्सद्दी बाई आपली मावशी आहे याचा एकदम अभिमानच वाटला तिला.

खो दिल्यासारखी पुढची एक चिमुरडी पण दोन मुलांची आई बोलू लागली....."अमोघच्यावेळी मी प्रेग्नंट असताना सानिका चार वर्षांची होती. तिला जेव्हा सांगितलं तेव्हा विचारलंच तिनं - बाळ आत कुठून गेलं आणि बाहेर कसं येणार वगैरे. नथिंग न्यू इन इट. आत जाण्याबद्दल फुलाबिलाचं उदाहरण देऊन जमेल तसं सांगितलं. पण खरी गोची पुढे होती. हॉस्पिटल मधे ऑपरेशन करून बाळ बाहेर काढतात हे हाफ ट्रुथ तिनं ऐकून घेतलं. नंतर एकदा घरगुती पार्टी होती. कुणी कुणी माझ्या तब्येतीची चौकशी करत होतं.ही एकदम म्हणाली "आई जंगलामधे हॉस्पिटल असतं का?" या प्रश्नाच्या पुढे काय वाढून ठेवलंय ते न लक्षात आल्यानं मी म्हटलं "काहीतरी काय. जंगलात कुठलं हॉस्पिटल." "मग वाघाचं बाळ कोण

बाहेर काढतं?" पुढच्या उत्तरानं पायावर नवा धोंडा पाडून घेणार हे न कळल्यानं मी म्हणाले, "प्राण्यांचं वेगळं असतं. नंतर सांगते." माझे शब्द खाली पडायच्या आत पुढचा प्रश्न, "

शिवाजीच्या वेळी हॉस्पिटलं नव्हती ना. तूच म्हणाली होतीस एकदा. मsssssग? " शिवजन्माचा हा नवा वाद त्यावेळी पोलिटिकली अगदी इनकरेक्ट होता. तिचं वाक्य मी तिथेच थोपवलं आणि म्हटलं आत्ता मी पाहुण्यांशी बोलतेय ना. मग सांगीन मी तुला सगळं. पण हे म्हणजे आजचं संकट उद्यावर घालण्यासारखं. पण या डॉक्टरांनी त्यांचं पुस्तक वाचायला दिलं आणि....मला बाळ-वाट सापडली." इतर जण किंचित किंचित हसले. पण ही झॅप्ड....पण हुशार ना....तिच्या डोळ्यासमोर चाईल्ड बर्थ इन रिअल टाईम ॲन्ड प्लेस ग्राफिक फिल्म दिसू लागली आणि बाळवाटेची ट्यूब पेटली. वॉव.... ओ रिअली, अमेझिंगली वॉव. व्हॉट ॲन आयडिया डॉक्टरजी!!! आता मात्र नवऱ्याशी हे सगळं कधी शेअर करतेय असं झालं तिला.

'रंग दे रंग दे' च्या साथीनं ती घरी आली.घरातली आवडणारी माणसं आणि न आवडणारं घरकाम सगळं कसं एकदम एन्जॉय करतोय असंच झालं तिला. रात्री नवऱ्याला फोन वरून पॅरेंटस्कूलची अनएडिटेड ऑडिओ डॉक्युमेटरी ऐकवली.त्यानं पेशंटली ऐकून घेतलं आणि मिश्किलपणे हसत म्हणाला "याला खरं तर 'पेरेंटिंग अनॉनिमस' म्हणायला पाहिजे. रंजल्या गांजल्या पेरेंट्सचा सपोर्ट ग्रुप". मनात खिदळून म्हणाली, "अय्या खरंच की... Oh dear, what will I do without your sense of humour!!!" आपण दिवसभरात नखं खाल्ली नाहीत याची तिला एकदम लख्ख जाणीव झाली.